मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दिनांक २८ ऑगस्ट २०२३। पान १

# 'मन की बात' मुळे समाजासाठी काम करण्याची मिळते प्रेरणा : शंकर जगताप

## शहरात ठिकठिकाणी 'मन की बात' लाईव्ह प्रक्षेपण

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी ।**

''संकल्प के सूरज चांद पर भी उगते हैं.. '' अशा शब्दांत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'चांद्रयान- ३' मोहीमेत यशस्वी झालेल्या शास्त्राज्ञांचे कौतूक केले. 'मन की बात' मुळे समाजासाठी आणखी सकारात्मक दृष्टीकोनातून काम करण्याची प्रेरणा मिळते, अशी प्रतिक्रिया भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टीतर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रिय 'मन की बात' कार्यक्रमाचा १०४ व्या भागाचे शक्तीकेंद्र, बूथ आणि मंडलनिहाय लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले. काकास इंटरनॅशनल स्कूल, तापकीरनगर येथे आयोजित कार्यक्रमात जगताप सहभागी झाले. यावेळी चिंचवड विधानसभा अध्यक्ष काळूराम बारणे, सांगवी-काळेवाडी मंडल अध्यक्ष विनोद तापकीर, माजी नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, सविताताई खुळे, ज्योतीताई भारती, माजी स्वीकृत नगरसेवक संदिप नखाते, पुणे नियोजन समिती सदस्य काळूराम नढे, अ‍ॅड. मंगेश नढे, हर्षद नढे, सोमनाथ तापकीर, रमेश काळे, प्रकाश लोहार, भरत ठाकूर, कैलास सानप, विकास साठे, आकाश भारती, सचिन काळे, पंकज मिश्रा यांच्यासह भाजपा पदाधिकारी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.



> "देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा देशवासियांसी होणारा सुसंवाद म्हणजे मन की बात. आजच्या 'मन की बात'मध्ये मोदीजींनी ''चांद्रयान-३'' मोहीम यशस्वी करणाऱ्या शास्त्रज्ञांचा गौरव केला. देशवासीयांसाठी अभिमानास्पद अशी कामगिरी करणाऱ्या इस्त्रोच्या वैज्ञानिकांचा सन्मान केला. तसेच, सप्टेंबर महिन्यात राजधानी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या ऋ- २० साठी भारत देश संपूर्णपणे तयार असून तब्बल ४० देशांचे राष्ट्राध्यक्ष यामध्ये सहभागी होणार आहेत. ही आपल्या देशासाठी अभिमानाची बाब आहे असे देखील त्यांनी सांगितले. या कार्यक्रमातून कायमच समाजासाठी शहरासाठी आपल्या देशासाठी काम करण्याची आणखी ऊर्जा मिळाते.
>
> — शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड

### तापकीरनगर येथे टिफीन बैठक

» दरम्यान, काकास इंटरनॅशनल स्कुल, तापकीर नगर येथे प्रभाग क्रमांक २२ व २७ च्या वतीने 'टिफिन बैठक' पार्टीचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये ११० हून अधिक लोक उपस्थित होते. सांगवी- काळेवाडी मंडल अध्यक्ष विनोद तापकीर व बजरंग दल वकील आघाडीचे मंगेश नढे यांनी आयोजन केले. भारतीय जनता पार्टीची ध्येय धोरणे आणि कल्याणकारी योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणखी सकारात्मक भूमिकेतून काम करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ नागरिक व भारतीय जनता पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# देशाला नवभारताच्या दिशेकडे प्रयत्न : गोरखे

## फुगेवाडीत मन की बात कार्यक्रमास नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

प्रभाग क्रमांक ३० दापोडीमध्ये देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मन की बात कार्यक्रम या कार्यक्रमाचे आज रविवारी (दि. २७) आयोजन करण्यात आले होते. यावेळी भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप व पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कार्यक्रम संपन्न झाला. शंकर जगताप यांनी आपले लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भारत देशाचा मानसन्मान संपूर्ण जगभरात कशाप्रकारे वाढवला व भारत सरकारच्या योजना गोरगरिबापर्यंत कशा पोहोचवल्या याबद्दलचे आपले मनोगत व्यक्त केले. त्याचबरोबर केंद्र सरकारच्या विश्वकर्मा या योजनेचा समाजातील प्रत्येक व्यक्तीला लाभ होईल, त्यासाठी केंद्र सरकार नेहमीच प्रयत्नशील राहील असे सांगितले.



तसेच पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे यांनी देखील मन की बात या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपले मनोगत व्यक्त केले. नरेंद्र मोदी हे आपल्या देशाला एका वेगळ्या नव भारताच्या दिशेकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याचबरोबर इस्त्रो (खडठज) ने चंद्रयान ३ संदर्भात जी कामगिरी केली आहे ती अविस्मरणीय आणि संपूर्ण जगाला अभिमान वाटावा अशी कामगिरी केली असताना त्याचेही कौतुक संपूर्ण जगभरात होत आहे. आपला देश नवनवीन संकल्पनेतून प्रगती करत असताना संपूर्ण जगभरात भारताचा गौरव वाढत आहे. या मन की बात या कार्यक्रमाचे आयोजन सागर फुगे यांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी सागर फुगे, सुरेश फुगे, मधुकर फुगे, चेतन फुगे, जगदीश घुगे, ओम फुगे, विशाल सातपुते, धर्मेंद्र शिरसागर, रघुनाथ जवळकर, घनश्याम सकट, जयश्री नवगिरे, देवदत्त लांडे, प्रकाश जवळकर, आबा कोळेकर, विशाल वाळुंजकर, मीनाक्षी गायकवाड, उषा वाखारे, प्रतिभा जवळकर, किरण फुगे, वैशाली वाखारे त्याच बरोबर भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. आभार प्रतिभा जवळकर यांनी मांनले.

## आज पालिकेची जनसंवाद सभा

**पिंपरी** : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये उद्या सोमवारी सकाळी १० ते १२ यावेळेत जनसंवाद सभा होणार आहे. नागरिकांशी सुसंवाद साधणे, तक्रारींचे निराकरण करणे आणि प्रशासकीय निर्णयांमध्ये तसेच होणा-या विकासकामांमध्ये नागरिकांच्या आशा आकांक्षांचे प्रतिबिंब उमटावे यासाठी क्षेत्रिय कार्यालयनिहाय महिन्यातील दुस-या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येत आहे. या सभेकरीता महानगरपालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयांसाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय मुख्य समन्वय अधिका-यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. ते या जनसंवाद सभेचे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत.

# राक्षे, शिंदे आणि कांबळे या गुन्हेगारी टोळ्यांवर पोलिसांकडून मोकांतर्गत कारवाई!

## २३९ आरोपींवर मोका कायद्यांतर्गत कारवाई

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

संघटित गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी राक्षे टोळी, शिंदे टोळी, कांबळे टोळी या तीन टोळ्यांवर पिंपरी चिंचवड पोलिसांकडून मोका पैटर्न नुसार कारवाई करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड विनय कुमार चौबे यांनी कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवून शरिराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. सन २०२३ मध्ये आजपावेतो पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील २७ संघटीत गुन्हेगारी टोळ्यांमधील एकुण २३९ आरोपींवर मोका कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.

१) भोसरी पोलीस ठाणे गु.र.नं. ५८० / २०२३ भादंवि ३९७, ३९४, ४२७, ५०४, ५०६, ३४, आर्म अॅक्ट ४ (२५), म.पो. का. कलम ३७ (१) सह १३५. क्रि. लॉ. अॅ. अॅक्ट कलम ३ व ७ चे तपासामध्ये आरोपी नामे (१) सुदर्शन ऊर्फ पिल्या संभाजी राक्षे, (टोळी प्रमुख) वय २७ वर्ष, रा. शास्त्री चौक, भोसरी पुणे (२) करण गुरुनाथ राठोड, वय २१ वर्षे, रा. रोडे हॉस्पीटल शेजारी, दिघी रोड, भोसरी पुणे (३) प्रथमेश ऊर्फ पत्या दिलीप कांबळे, वय २० वर्षे, रा. शास्त्री चौक, भोसरी पुणे. (४) विरेंद्र ऊर्फ विन्या विश्वनाथ चव्हाण, वय १९ वर्षे रा. राजा सोयायटी, शास्त्री चौक, भोसरी पुणे यांचेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर एकुण १६ गुन्हे दाखल असून १२ गंभीर गुन्हे केल्याची नोंद आढळून आलेली आहे.

२) पिंपरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ७०२ / २०२३ भा.दं.वि. कलम ३९२, ३२३, ५०४, ५०६, ४२७, ३४, महा.पो.का. ३७(१) सह १३५ चे तपासामध्ये आरोपी नामे १) अतुल काळूराम शिंदे. (टोळी प्रमुख) वय २२, रा. बौध्द विहार शेजारी, गांधीनगर पिंपरी पुणे (२) रोहन माणिक जाधव, वय १९ वर्षे, रा. बनसाळ गल्ली च्या बाजूला गांधीनगर, पिंपरी पुणे (३) किरण मंगेश बिरादार, वय २१ वर्ष, रा. दत्त मंदीरामागे, मोहननगर, चिंचवड पुणे (४) पवन ससाणे रा. गांधीनगर, पिपरी पुणे (पाहिजे आरोपी) यांचे विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर एकुण ०७ गंभीर गुन्हे केल्याची नाद आढळून आलेले आहेत.




३) पिंपरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ७२९ / २०२३ भा.द.वि. कलम ३९५, ४२७ या १) अंगद बळीराम कांबळे, (टोळी प्रमुख) वय ३८ वर्ष, रा. राजीव गांधी वसाहत बसतदादा पाटील शाळेचे मागे, नेहरूनगर, पिपरी पुणे २) आकाश शंकर लष्करे, वय २५ वर्ष, रा. बिटकर चाळ, साईबाबा मंदीराशेजारी, नेहरुनगर पिपरी ३) शाहरुख नईम शेख, २६ वर्ष, रा. वसंतदादा पाटील शाळेचे समोर, भोसलेनगर, नेहरुनगर पपरी पुणे (४) दिनेश गोरख माने, वय २९ वर्षे रा. विटकर चाळ, साईबाबा मंदीराशेजारी, नेहरूनगर पिपरी पुणे यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर एकुण १० गंभीर गुन्हे केल्याची नोंद आढळून आलेले आहे. वरील तीनही टोळी प्रमुख यांनी त्यांचे साथीदारांसह अन्य सदस्यांसाठी प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवून स्वतःची संघटीत टोळी तयार करुन अवैध मार्गाने आर्थिक फायदा मिळवण्याचे उद्देशाने स्वतःचे गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व दहशत प्रस्थापित ठेवण्यासाठी संघटित गुन्हेगारी संघटनेचा प्रमुख म्हणून किंवा संघटनेच्या वतीने एकटयाने किंवा संयुक्तपणे, हिंसाचाराचा वापर करून अथवा हिंसाचाराची धमकी देवून किंवा धाक दपटशा दाखवुन टोळी प्रमुख व साथीदार यांनी भोसरी, पिंपरी, देहूरोड, दिघी वाकड, एमआयडीसी भोसरी पोलीस स्टेशन हद्दीत खून, खुनाचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत करणे, जबरी चोरी, दुखापत करून जबरी चोरी करणे, पुरावा नष्ट करणे, दुखापत करणे, दरोडयाची तयारी करणे, घरात घुसून मारहाण करणे, खंडणी मागणे, कट रचणे, जिवे ठार मारण्याची धमकी देणे, छळवणुक करणे, प्रत्येक गुन्हा करताना त्यांनी वैयक्तिक व टोळीचे वर्चस्व वाढावे व आर्थिक फायदा व्हावा तसेच जनमाणसात दहशत रहावी हाच उद्देश ठेवून टोळी प्रमुखांनी गुन्हे केलेले आहेत. सदर राक्षे टोळी, शिंदे टोळी व कांबळे टोळी या तीनही संघटीत टोळीतील साथीदार यांनी आपल्या गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व रहावे व आर्थिक फायद्यासाठी संघटीतपणे दहशतीचे मार्गाने स्वतःचे बेकायदेशिरपणे आर्थिक फायदयाकरीता सदरचे गुन्हे केल्याचे दिसून आल्याने, तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ळळ). ३(४) प्रमाणेचा अंतर्भाव करणे बाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त कार्यालय येथे सादर केला असता सदर प्रस्तावामधील कागदपत्रांची छाननी करून नमूद गुन्ह्यांत महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ळळ). ३(४) या कलमांचा अंतर्भाव करण्याचे आदेश मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त पिंपरी

### यांची उल्लेखनिय कामगीरी

» सदरची उल्लेखनिय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री कुमार चोबे, मा. पोलीस सहआयुक्त डॉ. संजय शिंदे, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, मा. पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे मैडम, मा. पोलीस उप-आयुक्त (परि-०१) श्री. विवेक पाटील, मा.सपोआ श्री. सतिश कसबे (पिंपरी विभाग), मा.सपोआ श्री. बाळासाहेब कोपनर (गुन्हे- १) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि पी.सी.बी (गुन्हे शाखा), वपोनि भास्कर जाधव, (भोसरी पो स्टे), पोनि श्री. राम राजमाने (पिंपरी पो.स्टे), पोउपनि सुहास खाडे (भोसरी पो.स्टे) तसेच अंमलदार पो. हवा सचिन चव्हाण, पो.हवा. व्यंकण्या कारभारी, (पी.सी.बी. गुन्हे शाखा), पोउपनि सुहास खाडे, पोहवा राजेंद्र राठोड, पोशि वसंत दळवी (भोसरी पो. स्टे.), सपोफी अनिल गायकवाड, मपोना माया कोल्हे, पो.शि. दत्ताजी कौठेकर (पिंपरी पो.स्टे.) यांचे पथकाने केली आहे.

# झाडे लावा, झाडे जगवा संदेश प्रत्यक्षात अमलात

## संत गाडगेबाबा महाराज जेष्ठ नागरिक व मराठवाडा जनविकास संघाच्या वतीने वृक्षारोपण

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

झाडे लावा, झाडे जगवा संदेश प्रत्यक्षात अमलात आणण्यासाठी आणि प्रदूषण मुक्तीचा संदेश देण्यासाठी संत गाडगेबाबा महाराज जेष्ठ नागरिक संघ व मराठवाडा जनविकास संघ पिंपळे गुरव यांच्या वतीने पेरू, चिकू, वड, सिताफळ, पिंपळ या पर्यावरणपूरक रोपांचे काशीदनगर येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी मराठवाडा जनविकास संघाचे संस्थापक अध्यक्ष अरुण पवार,



संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्रीकृष्ण फिरके, अमोल लोंढे, रोहित जाधव, शिवाजी भोईर, सुरेश दिघे, पांडुरंग भोसले, अनंत चिंचोले, प्रकाश चिटणीस, चांदमल सिंगवी, अनंत जाधव, अंजली कुलकर्णी, कमल पवार, साळूताई इसटे, कांतीलाल कानगुडे, दत्तात्रय वाणी आदी उपस्थित होते.

श्रीकृष्ण फिरके म्हणाले, की आजच्या युवकांनी व तरुणांनी काळाची गरज लक्षात घेता पर्यावरणासाठी वृक्षारोपण करणे गरजेचे आहे. मात्र, ते काम वयाची सत्तर वर्षे ओलांडलेल्या व्यक्ती करीत आहेत, याचे तरुणांनी अनुकरण केले पाहिजे. अरुण पवार म्हणाले, की आज ग्लोबल वॉर्मिंगचा धोका लक्षात घेता झाडे लावून ती जगविणे काळाची गरज बनली आहे. त्यामुळे प्रत्येकाने झाड लावून त्याचे पर्यावरण संवर्धनासाठी पुढे आले पाहिजे. आज मराठवाडा जनविकास संघाने राज्यभरात पंचवीस हजाराहून अधिक वृक्षांची लागवड करून ती संरक्षक जाळीच्या माध्यमातून जपली आहेत.

# सावित्रीबाई फुले विद्यापिठाच्या प्रकुलगूरूपदी गुन्हेगार असलेल्या व्यक्तीची नियुक्ती कशी?

## विरोधी पक्षनेते विजय वड्डेवारांनी घेतला आक्षेप

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट असा नावलौकिक असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्र - कुलगुरू पदी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीची नियुक्ती करून नेमके काय साध्य करायचे आहे ? सदर नियुक्ती ही राजकीय दबावातूनच झाली असून ती तात्काळ रद्द करण्यात यावी अशी मागणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. वडेट्टीवार म्हणाले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. चरित्र जोपासना हे विद्यापीठाचे काम आहे. प्र. कुलगुरुंची (प्रो व्हीसी) निवड हा एक महत्त्वपूर्ण निर्णय असुन जो विद्यापीठाच्या भविष्यकालीन वाटचालीवर आणि विद्यापीठाच्या प्रशासन तसेच शैक्षणिक गुणवत्तेवर लक्षणीय परिणाम करू शकतो. प्र - कुलगुरू पदी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीच्या नियुक्तीने केवळ तात्काळ शैक्षणिक परिदृश्यावर परिणाम होणार नाही तर सावित्रीबाई फुलें पुणे विद्यापीठाच्या भविष्यातील वाटचालीवरही त्याचा परिणाम होणार आहे. पण विद्यापीठात जर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींची नियुक्ती होत असेल तर हे अतिशय गंभीर आहे. यातून नेमके काय साध्य करायचे आहे? प्र - कुलगुरू भ्रष्टाचार किंवा गैरवर्तनाच्या



कोणत्याही आरोपांपासून मुक्त असावे. तसेच त्यांचा रेकॉर्ड निर्दोष असण्याची जोरदार मागणी होत असताना प्र-कुलगुरूंची स्वच्छ प्रतिमा असावी आणि कोणत्याही प्रकारच्या आरोपाखाली त्यांचे नाव नसावे. अशी अपेक्षा विद्यापीठ शिक्षक व शिक्षकेत्तर संघटनेच्या व विद्यापीठ समुदायाच्या एका वर्गाने व्यक्त केली असताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्र - कुलगुरू पदी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या डॉ. पराग काळकर यांची नियुक्ती करण्यामागे नेमके कारण काय? डॉ.पराग काळकर हे विद्यापीठाच्या वाणिज्य विभागाचे अधिष्ठाता (डीन) होते. २०१७ ते १८ या कालावधीत त्यांनी आर्थिक गुन्हे केले होते. पिंपरी चिंचवड येथील पोलीस ठाण्यात भादवी ४०६,४०९,४२० असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे त्याच्यांवर दाखल आहेत. असे असताना कुठलीही शहानिशा न करता, ही नियुक्ती कशी झाली? हा गंभीर प्रश्न आहे. अशाच नियुक्त्या करायच्या असतील तर संपूर्ण प्रक्रिया राबविण्याची गरजच काय? राजकीय नियुक्त्या असतील तरी थोडी खातरजमा करून त्या केल्या जाऊ शकतात. पण, अशा नियुक्त्या करून आपण जनतेला काय संदेश देऊ इच्छितो ? हे सरकारने स्पष्ट करावे.

### भविष्यातील वाटचालीवरही परिणाम

» प्र – कुलगुरु पदी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीच्या नियुक्तीने केवळ तात्काळ शैक्षणिक परिदृश्यावर परिणाम होणार नाही तर सावित्रीबाई फुलें पुणे विद्यापीठाच्या भविष्यातील वाटचालीवरही त्याचा परिणाम होणार आहे. पण विद्यापीठात जर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींची नियुक्ती होत असेल तर हे अतिशय गंभीर आहे.

# शिवछत्रपतींचे राज्य हे रयतेचे : शरद पवार

## इतिहासातील असामान्य घटना' या ग्रंथाचे शरद पवार यांच्या हस्ते प्रकाशन

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

देशात अनेक राजे, संस्थानिक होऊन गेले. मुघल, यादवांसह अनेक सत्ता होत्या. त्यांची राज्ये ही त्यांच्या कुटुंबाच्या नावाने इतिहासात नोंदली गेली. छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य हे वेगळे होते. ते कधीही भोसल्यांचे राज्य म्हणून ओळखले गेले नाही. ते नेहमीच रयतेचे राज्य राहिले, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी रविवारी केले. शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त सह्याद्री प्रतिष्ठानने तयार




केलेल्या 'शिवराज्याभिषेक : भारताच्या इतिहासातील असामान्य घटना' या ग्रंथाचे प्रकाशन शरद पवार यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. ग्रंथाचे मुख्य संपादक डॉ. सदानंद मोरे यांना शिवराज्यभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. खासदार श्रीनिवास पाटील, विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित, एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, प्रतिभा पवार, ज्येष्ठ इतिहास अभ्यासक पांडुरंग बलकवडे आणि सह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल निवृत्ती पवार या वेळी उपस्थित होते. पवार म्हणाले, की छत्रपती शिवाजी महाराजांनी सामान्य माणसाला संघटित करून राज्य उभे केले. आधी एकप्रकारे परकियांचेच राज्य होते. सबंध समाज मरगळलेल्या अवस्थेत आणि परकियांच्या गुलामगिरीत होता. पिताश्रींनी शिवनेरीवर त्यांना मातेसमवेत आणून ठेवले. त्यांना इतर कुणाचे मार्गदर्शन लाभले हे खरे नाही. केवळ मातेचेच त्यांना मार्गदर्शन मिळाले. त्यातून समाजाला जागृत करून राज्य उभे करण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांनी भोसल्यांचे राज्य नव्हे, तर हिंदवी स्वराज्य म्हणजेच रयतेचे राज्य उभे केले. त्याला सर्वांचीच मान्यता मिळावी, यासाठी त्यांनी राज्याभिषेक केला. डॉ. मोरे म्हणाले की, शिवराज्याभिषेकाबद्दल अनेकांनी लिहून ठेवले आहे. वेगवेगळे लोक त्याकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहतात हे त्यातून समोर येते. यामधून शिवचरित्रही उलगडत जाते. या ग्रंथातून तोच प्रयत्न करण्यात आला आहे. अनिल पवार यांनी प्रास्ताविक केले. चेतन कोळी यांनी सूत्रसंचालन केले.

### गोब्राह्मण प्रतिपालक नव्हे

» इतिहासाकडे पाहण्याची दृष्टी वेगळी असावी लागते. तो कुणी आणि का लिहिला या बाबी तपासाव्या लागतात. गोब्राह्मण प्रतिपालक असे शिवाजी महाराजांना म्हणणे चुकीचे आहे. महात्मा फुले यांनी म्हटल्याप्रमाणे ते रयतेचे राजे होते. शिवाजी महाराजांना चिकटलेल्या प्रतिमांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास व्हायला हवा, असे मत डॉ. राजा दीक्षित यांनी मांडले.

# दिवंगत प्रा. हरी नरके यांच्या कुटुंबीयांना २५ लाखांची मदत!

## समता परिषदेच्या वतीने मदतीचा हात



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** फुले- शाहू - आंबेडकर चळवळीचे अभ्यासक, इतिहास संशोधक प्रा. हरी नरके सर यांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे ते मार्गदर्शक होते.अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेतर्फे नरके सरांच्या परिवाराला आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला होता आज हरी नरके सर यांच्या निवासस्थानी छोटेखानी आयोजित केलेल्या कार्यक्रमात माजी आमदार पंकज भुजबळ यांच्या उपस्थितीत नरके परिवाराला २५ लाखांची आर्थिक मदत दिली गेली. प्रा. हरी नरके सर यांचे प्रत्येक क्षेत्रातले योगदान खूप मोठे आहे. त्यांची अनेक भाषणे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात झालेली आहेत त्यांनी केलेले पत्रव्यवहार देखील अभ्यास करण्यासारखे आहेत त्यामुळे ही सर्व भाषणे, त्यांचे लेख, त्यांचे पत्रव्यवहार हे जतन करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे अशी माहिती माजी आमदार पंकज भुजबळ यांनी दिली. प्रा. हरी नरके सर हे समता परिषदेचे मार्गदर्शक आणि आधारस्तंभ होते आज आमचा आधारस्तंभ आमच्या मध्ये नाही परंतु आम्ही समता परिषदेच्या वतीने हरी नरके सर यांचे कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्रभर प्रबोधनाचे कार्यक्रम घेत राहू अशी माहिती देखील पंकज भुजबळ यांनी दिली. यावेळी अखिल भारती महात्मा फुले समता परिषदेच्या महिलाध्यक्षा मंजिरी धाडगे, वैष्णवी सातव, गौरी पिंगळे, सपना माळी, नागेश गवळी, पंढरीनाथ बनकर, अविनाश चौरे, शिवराम जांभूळकर , सागर दरोडे, प्रदीप हुमे, त्याचबरोबर प्रा. हरी नरके यांच्या पत्नी संगीता नरके आणि मुलगी प्रमीती नरके यावेळी उपस्थित होते.

# फुटबॉल विकासासाठी जर्मनीतील बुंदेसलिगासह करार!

## क्रीडा आयुक्तांनी दिली माहिती



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्यात फुटबॉलच्या विकासासाठी महाराष्ट्र सरकार बुंदेसलिगासोबत करार करणार आहे. या करारानुसार बुंदेसलिगाच्या सहकार्याने राज्यात १४ वर्षांखालील लीग सुरु करण्याचा मानस असल्याची माहिती क्रीडा आयुक्त सुहास दिवसे यांनी दिली. तसेच जगज्जेती तिरंदाज आदिती स्वामीचा यथोचित गौरव करण्यात येणार असून, पुरस्कार वितरणात क्रीडा गुणवत्तेला न्याय देण्याचा पूर्ण प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगितले.

श्री शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्रदान कार्यक्रम सोमवारी बालेवाडी येथील क्रीडा संकुलात होणार आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या पत्रकार परिषदेत दिवसे बोलत होते. राज्यातील क्रीडा गुणवत्तेचा गौरव करताना देण्यात येणाऱ्या श्री शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराबाबत कायमच होणारे वाद लक्षात घेता पुढील वर्षी म्हणजे २०२३-२०२४ पासून पुरस्काराच्या नियमावलीत सूसुत्रता आणि एकवाक्यता आणण्याच्या प्रयत्न केला जाईल, असे दिवसे यांनी सांगितले. थकित तीन वर्षांच्या पुरस्कार वितरणात ऋषिकेश अरणकल्ले, महेश ठाकरे आणि अभिजीत गुरव या तीन खेळाडूंचा नव्याने समावेश करण्यात आला. त्याचवेळी यापूर्वी जाहीर झालेल्या अमिता वाणी यांचा पुरस्कार स्थगित करण्यात आला आहे.

तीन वर्षांचे थकित पुरस्कार जाहीर झाल्यानंतर काही खेळाडूंनी अन्याय झाल्याचे सांगत उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाने यात हस्तक्षेप करताना खेळाडूंचे म्हणणे ऐकून घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार न्यायालयात गेलेल्या खेळाडूंचे म्हणणे ऐकून घेत राज्य क्रीडा प्रशासनाने त्यामधील मल्लखांबपटू ऋषिकेश अरणकल्ले या एकाच खेळाडूची विनंती मान्य करून त्याला २०२०-२१ साठी पुरस्कार जाहीर केला. विराज लांडगे, विराज परदेशी, कल्याणी जोशी या खेळाडूंची विनंती अमान्य करण्यात आली. त्याचबरोबर राज्याकडे स्वतंत्र अर्ज करणाऱ्या महेश ठाकरे (आट्यापाट्या), अभिजित गुरव (पॉवरलिफ्टिंग) या खेळाडूंचीदेखिल विनंती सर्व चौकशीनंतर मान्य करण्यात आल्याचेही दिवसे यांनी सांगितले. खेळांच्या संघटनांमधील अतंर्गत वाद आणि खेळांचा दर्जा हा चर्चेचा विषय असून, अशा सर्व संघटनांचा सर्वंकष अभ्यास करून नव्या वर्षात पुरस्कार नियमावलीत बदल केले जातील. पुरस्कारासाठी खेळाडूंनी न्यायालयात जाणे हे दुर्दैवी असून, भविष्यात अशी वेळ पुन्हा येणार नाही यासाठी नियमावली परिपूर्ण केली जाईल, असा विश्वासही दिवसे यांनी व्यक्त केला.

### वाणी यांचा पुरस्कारही स्थगित

» वुशू या खेळातील क्रीडा उपप्रकारावरून वेगवेगळे मतप्रवाह समोर आले आहेत. या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून या पुरस्काराचा वाद क्रीडा पुरस्कार समितीसमोर ठेवण्यात आल्याचे दिवसे यांनी सांगितले. या समितीच्या अहवालानंतर या संदर्भात निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे न्यायालयात गेलेल्या कल्याणी जोशी यांचीही विनंती क्रीडा मंत्रालयाने फेटाळली असून, याच निकषाला धरून यापूर्वी जाहीर झालेल्या मिताली वाणी यांचा पुरस्कारही स्थगित करण्यात आला आहे.